**एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-३ (सीपीटीपी-३) अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या सहायक संचालक महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

कार्यालयीन आदेश क्रमांक -टिआरएन-२०१९/प्र.क्र.१७/सीपीटीपी-अ

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई

दिनांक-०६/०६/२०२४

वाचा :- १.सा.प्र.वि.,शासन निर्णय क्र.टिआरएन-२०१३/प्र.क्र.८४/१३/१८-ब, दि.२०/०१/२०१४

२.सा.प्र.वि.,कार्यालयीन आदेश, क्र.टिआरएन-०४१६/ प्र.क्र.६१/१६/१८-ब , दि.०४/०८/२०१६

३. वित्त विभागाचे क्रमांक संलेको-२०२२/प्र.क्र.०६/कोषा-प्रशा-२, दिनांक २१/०६/२०२३ व दिनांक ०५/१०/२०२३, दिनांक ०१/१२/२०२३ आणि दिनांक ०६/०२/२०२४ रोजीची पत्रे

४.वित्त विभागाचे पत्र क्रमांक संलेको-२०२२/प्र.क्र.०६/कोषा प्रशा-२, दिनांक २३/०५/२०२२, दिनांक १४/०५/२०२४

## कार्यालयीन आदेश

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्यसेवा (मुख्य) परीक्षा-२०१५ अन्वये सहायक संचालक महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ या पदावर नियुक्तीसाठी वाचा येथील अनुक्रमांक २ येथील कार्यालयीन आदेशान्वये परिविक्षाधीन उमेदवारांना एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-३ (सीपीटीपी-३) अंतर्गत म्हणून प्रशिक्षणासाठी नियुक्ती देण्यात आली होती. एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-२ (सीपीटीपी-२) अंतर्गत प्रशिक्षण कालावधी दिनांक ०२/०५/२०१५ ते दिनांक ३०/०४/२०१८ असा होता.

२. उपरोक्त वाचा येथील क्रमांक ४ येथील पत्रान्वये सहायक संचालक, वित्त व लेखा सेवा, गट-अ या पदासाठी दिनांक २४/०५/२०२२ ते दिनांक २७/०५/२०२२ या कालावधीत होणाऱ्या विभागीय परीक्षेला बसण्यासाठी श्री. शरद लोंढे यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या पाचव्या विशेष संधीत श्री. लोंढे उत्तीर्ण झाले आहेत.

३. श्री. शरद लोंढे, प्रशिक्षणार्थी सहायक संचालक, वित्त व लेखा सेवा, गट-अ यांनी दिनांक ०२/०५/२०१६ ते दिनांक २८/०५/२०२२ या परिविक्षा कालावधीत खालील विवरणपत्रातील स्तंभ क्रमांक ६ मध्ये दर्शविलेला कालावधीइतक्या रजा उपभोगलेल्या आहेत. तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक ३१/०३/२०२१ नुसार विभागीय परीक्षेच्या शेवटच्या पेपर नंतरच्या लगतच्या दुसऱ्या दिवसाचा दिनांक हा परीक्षा उत्तीर्ण होण्याचा दिनांक समजण्यात येतो. त्यानुसार श्री. लोंढे यांनी विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक

२८/०५/२०२२ हा असून त्यांचा परिविक्षा कालावधी विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापर्यंत वाढविण्यात येऊन स्तंभ क्रमांक ८ मध्ये नमूद केलेल्या दिनांकास समाप्त करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नाव | मुळ प्रवर्ग | शिफारस प्रवर्ग | परिविक्षाधीन म्हणून सेवेत नियुक्तीचा दिनांक | परिविक्षा कालावधीत उपभोगलेल्या रजा | विभागीय परीक्षा उत्तीर्ण संधी | परिविक्षा कालावधी समाप्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | श्री. शरद गंगाधर लोंढे | OPEN | OPEN | ०२/०५/२०१६ (म.पू.) | २४५ दिवस | ५ व्या विशेष संधीत उत्तीर्ण | २८/०५/२०२२ (म.नं.) |

५.  श्री. शरद लोंढे, प्रशिक्षणार्थी सहायक संचालक, वित्त व लेखा सेवा, गट-अ यांनी परिविक्षा कलावधीत घेतलेल्यारजेचा तपशील संबंधित प्रशासकीय विभागाने प्रमाणित केलेला आहे. त्याआधारे सदर आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स्मिता जोशी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति

श्री. शरद गंगाधर लोंढे, सहायक संचालक महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ (ईमेलद्वारे)

प्रत,

१. सह सचिव/ उप सचिव, (आस्था- सहायक संचालक महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे
३. महालेखापाल, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर
४. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे
६. निवडनस्ती